Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक
सत्याचे प्राईम्स
# जन सम्राट टाईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

।रविवार, दि. 31 मे २०२६। वर्ष १ ।अंक ५६ ।पाने २।

DIGITAL EDITION



पुणे अग्रवाल समाजाचे भूषण राजेश अग्रवाल यांची अखिल भारतीय अग्रवाल संमेलनाच्या राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्यपदी निवड

(पान २ वर)

Selected

## इंधन दरवाढीवरून देशात 'मिनी लॉकडाऊन'ची चर्चा; सुप्रिया सुळेंचे स्पष्ट विधान

**मुंबई :** इराण आणि अमेरिका यांच्यात वाढलेल्या तणावाचे पडसाद आता जागतिक अर्थव्यवस्थेवर उमटू लागले आहेत. ऊर्जा बाजारपेठेतील अस्थिरतेमुळे अनेक देशांमध्ये इंधनाच्या किमतींमध्ये वाढ झाली असून भारतातही पेट्रोल, डिझेल आणि सीएनजीच्या दरांनी सर्वसामान्यांचे आर्थिक गणित बिघडवले आहे. या पार्श्वभूमीवर देशात संभाव्य निर्बंध किंवा 'मिनी लॉकडाऊन' लागू होण्याच्या चर्चांना उधाण आले असताना खासदार सुप्रिया सुळे यांनी यावर महत्त्वपूर्ण भूमिका स्पष्ट केली आहे. वाढत्या इंधन दरांचा परिणाम वाहतूक, उद्योग, शेती आणि दैनंदिन जीवनावश्यक वस्तूंच्या किमतींवर होत असल्याने नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. याच विषयावर माध्यमांशी संवाद साधताना सुप्रिया सुळे म्हणाल्या की, जागतिक स्तरावर निर्माण होणाऱ्या संकटांचा परिणाम भारतावर होणार, याबाबत विरोधी पक्षांनी यापूर्वीच इशारा दिला होता.

## भाजप-शिंदे गटातील रस्सीखेचीनंतर राजकीय वातावरण तापले

# जळगावात ठाकरे गटामुळे महायुतीच्या बिनविरोध विजयाला ब्रेक!

### भाजपच्या उमेदवाराला हिरवा कंदील, शिंदे गटात नाराजीची चर्चा • जळगाव विधान परिषद निवडणूक ठरणार प्रतिष्ठेची लढत

जन सम्राट टाईम्स

**जळगाव : स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जळगाव जिल्ह्यातील राजकीय घडामोडींना वेग आला असून, महायुतीच्या बिनविरोध विजयाच्या रणनीतीला ठाकरे गटाने मोठा धक्का दिला आहे. महाविकास आघाडीकडून निवडणूक लढविण्याचा निर्णय झाल्यानंतर आता या मतदारसंघात थेट लढत होण्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.**




महायुतीमध्ये जळगावच्या जागेवरून गेल्या काही दिवसांपासून भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) यांच्यात जोरदार रस्सीखेच सुरू होती. जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भाजपचे संख्याबळ अधिक असल्याचा दावा करण्यात येत होता, तर शिवसेना शिंदे गटानेही या जागेवर आपला हक्क कायम ठेवण्यासाठी वरिष्ठ पातळीवर प्रयत्न सुरू ठेवले होते. मुंबईतील बैठका, पक्षश्रेष्ठींसोबतच्या चर्चा आणि स्थानिक पातळीवरील राजकीय हालचालींनंतर अखेर भाजपच्या उमेदवाराला हिरवा कंदील मिळाल्याची माहिती समोर येत आहे.

मात्र या निर्णयामुळे शिंदे गटातील काही स्थानिक पदाधिकाऱ्यांमध्ये नाराजी असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. दुसरीकडे महाविकास आघाडीने ही निवडणूक प्रतिष्ठेची करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. महाविकास आघाडीच्या जागावाटपानुसार जळगावची जागा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाला देण्यात आली आहे. पक्षाचे जिल्हा संपर्क प्रमुख संजय सावंत यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, "जिल्ह्यात पक्षाचे संख्याबळ मर्यादित असले तरी लोकशाही प्रक्रियेत निवडणूक लढविणे आवश्यक आहे. महायुतीचा उमेदवार बिनविरोध निवडून जाऊ नये, यासाठी आम्ही मैदानात उतरत आहोत."

ठाकरे गटाकडून निलेश चौधरी आणि शरद तायडे या दोन नावांची चर्चा सुरू असून, निलेश चौधरी यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. तर शरद तायडे सोमवारी अर्ज दाखल करणार असल्याचे सांगितले जात आहे. या दोघांपैकी एका उमेदवाराला अधिकृत 'एबी फॉर्म' दिला जाणार असून अंतिम निर्णय पक्षश्रेष्ठी घेणार आहेत.

राजकीय विश्लेषकांच्या मते, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील संख्याबळामुळे महायुतीचे पारडे अद्यापही जड आहे. मात्र, ठाकरे गटाने निवडणुकीत उतरल्याने बिनविरोध निवडीची शक्यता जवळपास संपुष्टात आली आहे. त्यामुळे आता ही निवडणूक केवळ एका जागेची लढत न राहता आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांची रंगीत तालीम ठरणार असल्याचे मानले जात आहे. दरम्यान, ठाकरे गटाकडून अपक्ष सदस्य तसेच महायुतीतील नाराज घटकांशी संपर्क वाढविण्याचे प्रयत्न सुरू असल्याची चर्चा आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत राजकीय समीकरणांमध्ये मोठे बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अंतिम टप्प्यात जिल्ह्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, गुप्त बैठका, नाराजीचे सूर आणि रणनीतीच्या हालचालींमुळे निवडणुकीची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

### कोणाचे पारडे जड?

स्थानिक स्वराज्य संस्थांमधील संख्याबळ पाहता महायुतीचे गणित मजबूत मानले जात असले, तरी ठाकरे गटाने निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतल्यामुळे राजकीय लढत अधिक रंगतदार झाली आहे. या निवडणुकीचा परिणाम आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि महापालिका निवडणुकांच्या रणनीतीवरही होणार असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे.

### महत्त्वाचे मुद्दे

- अखेर भाजपच्या उमेदवाराला पसंती मिळाल्याची चर्चा
- ठाकरे गटाने निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतल्याने बिनविरोध निवडीची शक्यता संपली
- निलेश चौधरी यांनी अर्ज दाखल; शरद तायडेही रिंगणात
- अपक्ष आणि नाराज सदस्यांवर सर्व पक्षांचे लक्ष
- निवडणूक ठरणार आगामी स्थानिक राजकारणाची रंगीत तालीम

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज

## गोलाणी व्यापारी संकुलात स्वच्छता राखा, अन्यथा दंड; महापालिकेचा व्यापाऱ्यांना इशारा

### व्यापाऱ्यांच्या शिष्टमंडळाने विविध समस्या मांडल्या



जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी :** जळगाव शहरातील प्रमुख व्यावसायिक केंद्र असलेल्या गोलाणी व्यापारी संकुल येथे वाढत्या अस्वच्छतेच्या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासनाने कडक भूमिका घेतली आहे. स्वच्छता न राखणाऱ्या व्यापाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचा स्पष्ट इशारा प्रशासनाने दिला आहे.

यासंदर्भात शुक्रवारी व्यापाऱ्यांच्या शिष्टमंडळाने महापालिका आयुक्त युरेश सुप्रिया यांची भेट घेऊन संकुलातील विविध समस्या मांडल्या. यामध्ये स्वच्छतेचा प्रश्न, बंद पडलेल्या कचरा कुंड्या आणि इतर नागरी सुविधांचा मुद्दा प्रामुख्याने उपस्थित करण्यात आला.

बैठकीत महापालिका प्रशासनाने व्यापाऱ्यांना दुकानासमोर कचरा न टाकण्याचे आवाहन केले. तसेच ओला व सुका कचरा वेगळा करून देणे बंधनकारक असल्याचे सांगण्यात आले. स्वच्छता नियमांचे उल्लंघन करणाऱ्या दुकानदारांवर दंड आकारण्यात येईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले.

व्यापाऱ्यांनी संकुलातील अनेक कचरा कुंड्या बंद अवस्थेत असल्याची तक्रार केली. ग्राहकांच्या सोयीसाठी उभारण्यात आलेल्या या कुंड्या सध्या वापरात नसून काही ठिकाणी बंद लिफ्टजवळ ठेवण्यात आल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. यावर महापालिका प्रशासनाने तातडीने दखल घेत संबंधित विभागाला कचरा कुंड्या पुन्हा कार्यान्वित करण्याचे निर्देश दिले. महापालिकेच्या या भूमिकेमुळे गोलाणी व्यापारी संकुलातील स्वच्छता व्यवस्थेत सुधारणा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तसेच व्यापाऱ्यांनीही प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी सहकार्य करण्याची तयारी दर्शविली आहे.

## जळगाव विधान परिषदेसाठी महाविकास आघाडीकडून शरद तायडे यांना उमेदवारी

जन सम्राट टाईम्स

**जळगाव |** जळगाव स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीसाठी महाविकास आघाडीने आपला उमेदवार जाहीर केला आहे. महाविकास आघाडीच्या जागावाटपानुसार ही जागा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाला देण्यात आली असून पक्षाचे जळगाव महानगराध्यक्ष तथा स्वीकृत नगरसेवक शरद शामराव तायडे यांना अधिकृत उमेदवारी देण्यात आली आहे.




जळगाव विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला आहे. महायुतीमध्ये ही जागा कोणत्या पक्षाला मिळणार याबाबत अद्याप अंतिम निर्णय झालेला नसताना महाविकास आघाडीने उमेदवार जाहीर करून आघाडी घेतली आहे.

उमेदवारी जाहीर झाल्यानंतर शरद तायडे यांनी निवडणूक प्रचाराची तयारी सुरू केली आहे. सोमवारी ते आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार असून यावेळी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) या महाविकास आघाडीतील घटक पक्षांचे प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत.

दुसरीकडे, जळगाव विधान परिषद जागेवरून महायुतीतील भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना यांच्यात रस्सीखेच सुरू असल्याची चर्चा आहे. त्यामुळे महायुतीकडून कोणाला उमेदवारी दिली जाते, याकडे आता जिल्ह्यातील राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. महाविकास आघाडीने उमेदवार घोषित केल्यामुळे जळगाव विधान परिषद निवडणुकीतील राजकीय वातावरण आणखी तापण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## सख्ख्या मावसाकडून अल्पवयीन मुलीवर अत्याचार

जन सम्राट टाईम्स

**सावदा । प्रतिनिधी ।** रावेर तालुक्यातील एका गावात नातेसंबंधांना काळीमा फासणारी धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. नात्याने मावसा लागणाऱ्या ४७ वर्षीय व्यक्तीने १७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याचा गंभीर आरोप असून, पीडितेच्या तक्रारीवरून सावदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हा प्रकार १२ नोव्हेंबर २०२५ ते २९ मे २०२६ या कालावधीत घडला. आरोपीने अल्पवयीन मुलीवर दबाव टाकत तिच्याशी बळजबरीने शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. दीर्घकाळ मानसिक त्रास सहन केल्यानंतर पीडित मुलीने धाडस दाखवत सावदा पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली. तक्रारीनुसार, आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ अंतर्गत कलम ६४(२)(एफ) व ३५१(२) तसेच PROTECTION OF CHILDREN FROM SEXUAL OFFENCES ACT (पोक्सो) कायद्याच्या कलम ४, ६ आणि ५(एन) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या गंभीर प्रकरणाचा तपास पोलिसांकडून सुरू असून, आरोपीविरुद्ध कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे. अल्पवयीन मुलीवर नात्यातील व्यक्तीकडूनच अत्याचार झाल्याची घटना समोर आल्यानंतर परिसरात संताप व्यक्त केला जात आहे.

## दारूकांड प्रकरणात मोठी कारवाई; दारू विक्रेत्यांपासून पोलीस अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांची चौकशी होणार – गिरीश महाजन

जन सम्राट टाईम्स

**मुंबई/पुणे |** पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसराला हादरवून सोडणाऱ्या विषारी दारूकांड प्रकरणात राज्य सरकारने कठोर भूमिका घेतली आहे. या प्रकरणातील जबाबदारांवर कोणतीही दया दाखवली जाणार नसून दारू विक्रेत्यांपासून संबंधित पोलीस अधिकाऱ्यांपर्यंत प्रत्येकाची सखोल चौकशी केली जाईल, असे स्पष्ट विधान मंत्री गिरीष महाजन यांनी केले आहे. विषारी दारूच्या सेवनामुळे पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये आतापर्यंत 18 जणांचा मृत्यू झाल्याची माहिती महाजन यांनी दिली. या घटनेमुळे राज्यभरात संतापाची लाट उसळली असून प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

मृतांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत राज्य सरकारने मृतांच्या कुटुंबीयांना



प्रत्येकी 5 लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे. महापालिकेकडून यापूर्वीच 1 लाख रुपयांच्या मदतीची घोषणा करण्यात आली आहे. काही पात्र कुटुंबीयांना महापालिकेत रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याबाबतही विचार सुरू असल्याचे महाजन यांनी सांगितले. "पोलिसांच्या अभयाशिवाय असे धंदे शक्य नाहीत" घटनेवर भाष्य करताना महाजन यांनी प्रशासनावरही ताशेरे ओढले. याआधीही अशा घटना घडल्या असतील, मात्र एकाच वेळी मोठ्या प्रमाणात मृत्यू झाल्यामुळे हा प्रकार समोर आला," असे ते म्हणाले.

## उत्पादन शुल्क विभागाच्या कार्यालयाच्या छतावरच दारूच्या बाटल्या; पुण्यात खळबळ

### विषारी दारूकांडानंतर युवक काँग्रेसचे आंदोलन; विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह

जन सम्राट टाईम्स

**पुणे |** विषारी दारू प्रकरणामुळे आधीच राज्यभर चर्चेत असलेल्या पुण्यात आता आणखी एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मद्य व अमली पदार्थांच्या निर्मिती, विक्री आणि वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी असलेल्या राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कार्यालयाच्या छतावरच दारूच्या रिकाम्या बाटल्या आढळल्याने मोठी खळबळ उडाली आहे. या घटनेमुळे विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात असून नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील विषारी दारूकांडात अनेकांचा मृत्यू झाल्यानंतर युवक काँग्रेसने राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कार्यालयाबाहेर तीव्र आंदोलन छेडले. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी कार्यालयाबाहेर मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

याच आंदोलनादरम्यान कार्यालयाच्या वरील पत्र्यावर काही काचेच्या दारूच्या बाटल्या आणि टिन आढळून आल्याने उपस्थितांमध्ये एकच चर्चा सुरू झाली. मद्यविक्री आणि अवैध दारूविरोधात कारवाई करणाऱ्या विभागाच्या कार्यालयाच्या छतावरच अशा बाटल्या कशा आल्या, याबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. त्यामुळे उत्पादन शुल्क विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कामकाजाबाबत संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, पुण्यातील विषारी दारू प्रकरणानंतर राज्य सरकार आणि प्रशासनाने कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. या प्रकरणात निष्काळजीपणाचा ठपका ठेवत राज्य उत्पादन शुल्क विभागातील १३ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. यासोबतच विभागाने अवैध दारू व्यवसायाविरोधात मोठी मोहीम हाती घेतली आहे. एका दिवसात तब्बल ५५ ठिकाणी छापेमारी करत हातभट्टी दारू विक्री आणि निर्मिती करणाऱ्या अड्ड्यांवर कारवाई करण्यात आली. या कारवाईत ४,४८० लिटर हातभट्टी दारू जप्त करून नष्ट करण्यात आली, तर दारू निर्मितीसाठी वापरले जाणारे सुमारे ४२ हजार लिटर रसायनही जप्त करून नष्ट करण्यात आले. या प्रकरणात ५५ आरोपींना अटक करण्यात आली असून सुमारे २४ लाख १२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. विषारी दारूकांडानंतर प्रशासनाकडून कारवाईचा धडाका

जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज

# गृह खाते 'पांडू हवालदार' चालवतो; राज्यात बेबंदशाहीचा कळस – हर्षवर्धन सपकाळ

## विषारी दारूकांड, वाढती गुन्हेगारी आणि आरक्षणाच्या प्रश्नावर सरकारवर जोरदार हल्लाबोल

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी ।** राज्यातील कायदा व सुव्यवस्था पूर्णपणे ढासळली असून खालपासून मंत्रालयाच्या सहाव्या मजल्यापर्यंत हप्त्यांची साखळी पोहोचत आहे. पोलिसांवर कोणाचाही वचक राहिलेला नसल्याने ड्रग्ज, हातभट्ट्या आणि विषारी दारूचा काळाबाजार खुलेआम सुरू असल्याचा घणाघाती आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला. राज्याचे गृह खाते 'पांडू हवालदार' चालवत असल्यामुळेच सर्वत्र बेबंदशाही माजल्याची टीका




करत त्यांनी उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राज्याला पूर्णवेळ सक्षम गृहमंत्री द्यावा, अशी मागणी केली. पुण्यातील विषारी दारूकांडात अनेकांचा मृत्यू झाल्यानंतरच सरकारला जाग आल्याचे सांगत सपकाळ म्हणाले की, हातभट्ट्या आणि अवैध दारू व्यवसाय एका रात्रीत उभे राहिलेले नाहीत. राज्यातील शहरांपासून ग्रामीण भागापर्यंत अनेक ठिकाणी हे अवैध धंदे राजरोसपणे सुरू आहेत. प्रशासन आणि पोलिस यंत्रणेच्या दुर्लक्षामुळेच अशा घटना घडत असल्याचा आरोप त्यांनी केला. मराठा आरक्षणावर सरकारने भूमिका स्पष्ट करावी मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर बोलताना सपकाळ यांनी तत्कालीन मुख्यमंत्री Eknath Shinde यांनी आंदोलनादरम्यान दिलेल्या आश्वासनांची आठवण करून दिली. नवी मुंबई आणि आझाद मैदानातील आंदोलनावेळी सरकारने नेमकी कोणती आश्वासने दिली होती, हे जनतेसमोर स्पष्ट करावे, अशी मागणी त्यांनी केली. आरक्षणाचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवायचा असेल तर जातनिहाय जनगणना करणे आवश्यक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. जातनिहाय आकडेवारी उपलब्ध झाल्यास मराठा समाजासह सर्व समाजांच्या आरक्षणाच्या प्रश्नावर न्याय्य तोडगा काढता येईल, असे त्यांनी सांगितले.

### 'पुणे गुन्हेगारीची राजधानी बनले'

दरम्यान, खासदार सुप्रिया सुळे यांनीही राज्य सरकारवर निशाणा साधला. गुन्हेगारीच्या बाबतीत पुणे राज्यात पहिल्या आणि देशात पाचव्या क्रमांकावर पोहोचल्याचा दावा करत त्यांनी पुणे शहर गुन्हेगारीची राजधानी बनल्याची टीका केली. विषारी दारूकांडातील मृतांचा आकडा अधिक असण्याची शक्यता व्यक्त करत हा आकडा लपवला जात असल्याचा संशयही त्यांनी व्यक्त केला. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी व्हावी यासाठी पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांना सक्तीच्या रजेवर पाठवावे, अशी मागणीही सुळे यांनी केली.

## 12 जिल्ह्यांवर आस्मानी संकट! पुढील 24 तास धोक्याचे; हवामान विभागाचा मोठा इशारा

जन सम्राट टाईम्स



**मुंबई/पुणे |** राज्यातील नागरिकांना गेल्या काही दिवसांपासून असह्य उष्णतेचा सामना करावा लागत असतानाच आता हवामान विभागाने मोठा इशारा दिला आहे. पुढील 24 तासांत राज्यातील अनेक भागांमध्ये वादळी वाऱ्यासह मेघगर्जना आणि जोरदार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. त्यामुळे उष्णतेपासून दिलासा मिळणार असला तरी शेतकरी आणि नागरिकांसमोर नव्या संकटाची शक्यता निर्माण झाली आहे.

भारतीय हवामान विभागाने विदर्भातील काही जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट जारी केला असून, उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांना येलो अलर्ट देण्यात आला आहे. छत्रपती संभाजीनगर, जळगाव, धुळे, नंदुरबार, नाशिक, जालना, बीड, परभणी, हिंगोली आणि नांदेड जिल्ह्यांमध्ये मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. गेल्या काही दिवसांपासून विदर्भात तापमानाने विक्रमी पातळी गाठली होती. चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी येथे राज्यातील सर्वाधिक 45.7 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली होती. प्रखर उष्णतेमुळे नागरिक अक्षरशः होरपळून निघत असतानाच आता वातावरणात अचानक बदल होत असल्याचे चित्र दिसत आहे.

अमरावती जिल्ह्यातील वरूड परिसरात रविवारी अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावत तब्बल एक तास गारपीट झाली. या गारपिटीमुळे संत्रा आणि मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. तापमानात घट झाली असली तरी फळबागांवरील संकट वाढले आहे.

# धुळ्यात किरकोळ वादातून दोन गटांत हाणामारी; घटना सीसीटीव्हीत कैद!

## राजकीय दबावातून खोटे गुन्हे दाखल केल्याचा आरोप

जन सम्राट टाईम्स




**जळगाव | प्रतिनिधी:** शहरातील आग्रा रोडवरील राजकमल टॉकीज परिसरात किरकोळ वादातून दोन गटांमध्ये झालेल्या हाणामारीची घटना समोर आली असून या घटनेचे सीसीटीव्ही फुटेजही समोर आले आहे. या घटनेत काही युवक जखमी झाले असून परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मिळालेल्या माहितीनुसार, २६ मे रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास दोन गटांमध्ये झालेला किरकोळ वाद अचानक उग्र रूप धारण करत हाणामारीत परिवर्तित झाला. दोन्ही गटांतील व्यक्ती एकमेकांवर धावून गेल्याचे दृश्य सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले आहे. घटनेनंतर परिसरात एकच धावपळ उडाली होती. दरम्यान, या प्रकरणाला आता वेगळे वळण मिळाले असून घड्याळवाली मशीद परिसरातील नागरिकांनी गंभीर आरोप केले आहेत. हाणामारीच्या वेळी घटनास्थळी उपस्थित नसतानाही गुजर कुटुंबातील काही तरुणांवर राजकीय दबावातून खोटे गुन्हे दाखल करण्यात आल्याचा दावा नागरिकांनी केला आहे. या संदर्भात नागरिकांच्या शिष्टमंडळाने जिल्हा पोलीस अधीक्षकांची भेट घेत सीसीटीव्ही फुटेजसह विविध पुरावे सादर केले. संबंधित तरुणांना अन्यायकारकपणे गुन्ह्यात अडकविण्यात आल्याचा आरोप करत या प्रकरणाची निष्पक्ष आणि सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, गेल्या काही महिन्यांपासून गुजर कुटुंबातील तरुणांना विविध प्रकरणांमध्ये लक्ष्य केले जात असून त्यांच्यावर राजकीय दबावातून गुन्हे दाखल केले जात आहेत. अशा प्रकारच्या आरोपांमुळे अनेक युवकांचे शैक्षणिक, सामाजिक आणि व्यावसायिक भविष्य धोक्यात येत असल्याची खंतही नागरिकांनी व्यक्त केली. "सीसीटीव्ही फुटेज आणि इतर पुरावे तपासून सत्य परिस्थिती समोर आणावी. निष्पक्ष चौकशी करून निरपराध व्यक्तींवरील गुन्हे रद्द करावेत," अशी मागणी नागरिकांनी पोलीस प्रशासनाकडे केली आहे. तसेच योग्य कारवाई न झाल्यास आमरण उपोषणाचा मार्ग अवलंबण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

### पुराव्यांच्या आधारे पुढील चौकशी...

यावेळी ॲड. रोहिदास वानखेडे, जयेश गायकवाड, अशोक गुजर, किरण गुळवे, बंटी वानखेडे, किशोर जाधव, राशिद अन्सारी, अमोल जाधव, कार्तिक गुजर, सुनील गवळी, सचिन विभुते, अनिताबाई गुजर, निर्मलाबाई गुजर, सुनीताबाई गुजर यांच्यासह परिसरातील अनेक नागरिक उपस्थित होते. दरम्यान, या प्रकरणाबाबत पोलिसांकडून अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नसून सादर करण्यात आलेल्या पुराव्यांच्या आधारे पुढील चौकशी केली जाणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

जन सम्राट टाईम्स | विशेष बातमी | ज

# राजेश अग्रवाल यांची अखिल भारतीय अग्रवाल संमेलनाच्या राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्यपदी निवड

## राष्ट्रीय संघटन संचालकपदाचीही जबाबदारी

जन सम्राट टाईम्स



**पुणे | प्रतिनिधी :** लायन्स क्लबचे लोकप्रिय, कार्यक्षम आणि दूरदृष्टी असलेले जिल्हा गव्हर्नर लायन राजेश अग्रवाल यांची अखिल भारतीय अग्रवाल संमेलनाच्या राष्ट्रीय कार्यकारी समिती सदस्य तसेच राष्ट्रीय संघटन संचालक या अत्यंत प्रतिष्ठेच्या पदांवर २०२६ ते २०३१ या पाच वर्षांच्या कालावधीसाठी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे पुणे शहर, महाराष्ट्र तसेच संपूर्ण अग्रवाल समाजात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून ही निवड समाजासाठी अभिमानाची आणि गौरवाची बाब मानली जात आहे. अखिल भारतीय अग्रवाल संमेलन ही भारतासह जगभरातील अग्रवाल समाजाचे प्रतिनिधित्व करणारी सर्वात जुनी, सर्वात मोठी आणि प्रभावशाली संस्था मानली जाते. सुमारे सहा कोटींहून अधिक अग्रवाल बांधवांना एकत्रित करणाऱ्या या संस्थेने सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय, धार्मिक, आर्थिक आणि राष्ट्रीय विकासाच्या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान दिले आहे. अशा राष्ट्रीय स्तरावरील संस्थेच्या नेतृत्वामध्ये स्थान मिळणे ही अत्यंत सन्मानाची बाब असून, लायन राजेश अग्रवाल यांच्या नेतृत्वगुणांची, संघटन कौशल्याची,समाजसेवेप्रती असलेल्या समर्पणाची ही मोठी दखल मानली जात आहे. लायन राजेश अग्रवाल यांनी आपल्या व्यावसायिक, सामाजिक आणि लायन्स चळवळीतील कार्यकाळात प्रभावी नेतृत्व, पारदर्शक कार्यपद्धती आणि सर्वसमावेशक दृष्टीकोनाचे उत्कृष्ट उदाहरण घालून दिले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा ३२३४-डी२ ने विविध नाविन्यपूर्ण उपक्रम यशस्वीपणे राबवून उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांच्या याच अनुभवाचा लाभ आता राष्ट्रीय स्तरावर संपूर्ण अग्रवाल समाजाला मिळणार आहे. ही नियुक्ती पुणे शहर, महाराष्ट्र, लायन्स परिवार आणि अग्रवाल समाजासाठी प्रेरणादायी ठरणारी असून युवकांसाठी नेतृत्व, समर्पण आणि सातत्यपूर्ण सामाजिक कार्याच्या बळावर राष्ट्रीय स्तरावर पोहोचण्याचा आदर्श निर्माण करणारी आहे.यावेळी लायन राजेश अग्रवाल यांनी अखिल भारतीय अग्रवाल संमेलनाची संघटनात्मक ताकद अधिक मजबूत करण्यासाठी, समाजातील विविध घटकांमध्ये एकात्मता वाढविण्यासाठी आणि समाजहिताचे नाविन्यपूर्ण उपक्रम देशभर राबविण्यासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही दिली. त्यांच्या या निवडीबद्दल विविध सामाजिक, शैक्षणिक, व्यावसायिक आणि लायन्स क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज | ज

# विवाहाचा राग अनावर; बापानेच केली मुलीची हत्या

## कल्याणमध्ये ऑनर किलिंग घटनेने खळबळ



जन सम्राट टाईम्स

**कल्याण | प्रतिनिधी :** कल्याण पश्चिमेतील पारेकरवाडी परिसरात घडलेल्या एका हृदयद्रावक घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. कुटुंबाच्या इच्छेविरुद्ध जाऊन आंतरजातीय प्रेमविवाह केल्याच्या रागातून एका वडिलांनी आपल्या विवाहित मुलीची धारदार शस्त्राने हत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. हत्या केल्यानंतर फरार झालेल्या आरोपी वडिलांना बाजारपेठ पोलिसांनी तीन दिवसांच्या शोधमोहीमेनंतर अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पारेकरवाडी येथील रचना रॉयल इमारतीत राहणाऱ्या गायत्री हिची तिचे वडील विनोद वसईकर यांनी हत्या केली. घटनेनंतर आरोपी फरार झाला होता. बाजारपेठ पोलिसांनी विशेष पथके तयार करून सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक तपास आणि गोपनीय माहितीच्या आधारे त्याचा शोध घेत अखेर त्याला ताब्यात घेतले. प्राथमिक चौकशीत या हत्येमागील कारण समोर आले आहे. गायत्रीने कुटुंबाच्या इच्छेविरुद्ध जाऊन इतर जातीतील तरुणाशी प्रेमविवाह केला होता. या विवाहाला तिच्या कुटुंबाचा विरोध होता. पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपी विनोद वसईकर यांनी यापूर्वी मुलीसाठी दोन वेळा साखरपुड्याची तयारी केली होती. मात्र गायत्रीने हे प्रस्ताव नाकारून स्वतःच्या पसंतीने विवाह केला होता. याच गोष्टीचा राग आरोपीच्या मनात कायम होता. घटनेच्या दिवशी गायत्री माहेरी आली होती. दुपारच्या जेवणानंतर वडील आणि मुलगी यांच्यात विवाहाच्या मुद्द्यावरून पुन्हा वाद झाला. हा वाद वाढत जाऊन संतापाच्या भरात आरोपीने धारदार शस्त्राने मुलीवर हल्ला केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. गंभीर जखमी झालेल्या गायत्रीचा घटनास्थळीच मृत्यू झाला. हत्या केल्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पसार झाला होता. मात्र पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करून त्याचा माग काढला. अखेर तीन दिवसांच्या शोधमोहीमेनंतर त्याला अटक करण्यात आली.

### विवाह केल्याच्या रागातून हे कृत्य

चौकशीदरम्यान मुलीने आंतरजातीय विवाह केल्याच्या रागातून हे कृत्य केल्याची कबुली आरोपीने दिल्याची माहिती पोलिस सूत्रांनी दिली. या घटनेमुळे कल्याण परिसरात हळहळ व्यक्त होत असून आंतरजातीय विवाह आणि कौटुंबिक मतभेदांमधून घडलेल्या या गंभीर गुन्ह्याने समाजमन हादरले आहे. बाजारपेठ पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत असून आरोपीविरुद्ध पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

# मोहने-टिटवाळा परिसरात अवैध दारू विक्रीचा सुळसुळाट; नागरिकांमध्ये संताप

जन सम्राट टाईम्स

**कल्याण | प्रतिनिधी :** कल्याण तालुक्यातील मोहने, गाळेगाव आणि टिटवाळा परिसरात अवैध हातभट्टी तसेच देशी-विदेशी दारू विक्रीचा व्यवसाय मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याचा आरोप समोर आला आहे. या अवैध धंद्यांमुळे परिसरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असून नागरिकांनी पोलिस प्रशासनाकडे तातडीने कारवाईची मागणी केली आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार गाळेगाव, शांताबाई नगर, धम्मदीप नगर, टिटवाळा इंदिरानगर, आर. एस. तरे मार्केट, मोहनेगाव तसेच अटाळी-आंबिवली रेल्वे स्थानक परिसरात मोठ्या प्रमाणावर अवैध देशी-विदेशी दारूची विक्री सुरू आहे. काही ठिकाणी हातभट्टीची दारूही सर्रासपणे विकली जात असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे महिला, ज्येष्ठ नागरिक आणि पालक वर्गामध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणी काँग्रेसच्या अनुसूचित जाती विभागाचे कल्याण-डोंबिवली शहराध्यक्ष ॲड. अजिंक्य साळवे यांनी गंभीर आरोप केले आहेत. त्यांनी सांगितले की,




या अवैध धंद्यांविषयी वेळोवेळी पोलिस प्रशासन आणि संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रारी करण्यात आल्या होत्या. मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप त्यांनी केला. "अवैध धंद्यांना प्रशासनाचे अभय मिळत आहे का?" असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे.

दरम्यान, पुणे परिसरात विषारी दारू प्रकरणात अनेक नागरिकांचा मृत्यू झाल्याच्या घटनेनंतर राज्यभरात अवैध दारू व्यवसायाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. अशा परिस्थितीत कल्याण तालुक्यातील विविध भागांमध्ये हातभट्टी आणि बेकायदेशीर दारू विक्री सुरू असल्याच्या आरोपांमुळे नागरिकांची चिंता वाढली आहे. स्थानिकांच्या मते, या अवैध व्यवसायामुळे परिसरातील युवक मोठ्या प्रमाणावर व्यसनाच्या आहारी जात आहेत. अनेक कुटुंबांवर त्याचा सामाजिक आणि आर्थिक परिणाम होत असून काही कुटुंबांचे संसारही उद्ध्वस्त झाल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. नागरिकांनी पोलिस प्रशासनाने तात्काळ धडक मोहीम राबवून अवैध हातभट्टी आणि दारू विक्री केंद्रांवर कारवाई करावी, संबंधितांविरुद्ध कठोर गुन्हे दाखल करावेत तसेच परिसर व्यसनमुक्त करण्यासाठी विशेष अभियान सुरू करावे, अशी मागणी केली आहे. आरोपांची सत्यता आणि अवैध दारू विक्रीचे स्वरूप याबाबत प्रशासनाकडून अधिकृत प्रतिक्रिया अद्याप समोर आलेली नसून, स्थानिकांचे आरोप आणि तक्रारींची चौकशी करून आवश्यक ती कारवाई केली जाईल का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# 2011 पूर्वीची शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमणे नियमित होणार!

## शासनाचे एकसंध व सुधारित धोरण जाहीर

जन सम्राट टाईम्स



**एरंडोल | प्रतिनिधी :** राज्यातील शासकीय जमिनीवरील 1 जानेवारी 2011 पूर्वीची निवासी अतिक्रमणे विशिष्ट अटी व शर्तींच्या अधीन राहून नियमित करण्यासाठी राज्य शासनाने एकसंध व सुधारित धोरण जाहीर केले आहे. यासंदर्भातील मानक कार्यपद्धती महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार लागू करण्यात आली असून पात्र नागरिकांनी संबंधित ग्रामपंचायत अथवा महसूल यंत्रणेशी संपर्क साधावा, असे आवाहन एरंडोलचे तहसीलदार गोपाल पाटील यांनी केले आहे. राज्य शासनाच्या 25 मार्च 2026 रोजीच्या शासन निर्णयानुसार मुंबई शहर आणि मुंबई उपनगर वगळता संपूर्ण महाराष्ट्रात महसूल विभागाच्या अखत्यारीतील शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमणे नियमित करण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच गायरान जमिनीवरील काही अतिक्रमणांनाही विशेष अटींसह नियमिततेचा लाभ मिळणार आहे. पती, पत्नी व अवलंबित अविवाहित मुले-मुली यांचा एक कुटुंब म्हणून विचार केला जाईल. संपूर्ण महाराष्ट्रात एका कुटुंबाला केवळ एका अतिक्रमणासाठीच नियमितीकरणाचा लाभ मिळणार असून त्यासाठी शपथपत्र देणे बंधनकारक आहे. नियमित करण्यात आलेली जमीन भोगवटादार वर्ग-2 म्हणून देण्यात येणार असून पाच वर्षांपर्यंत विक्री, भाडेपट्टा, गहाण किंवा वापरात बदल करता येणार नाही. अटींचे उल्लंघन झाल्यास जमीन पुन्हा शासन जमा करण्यात येईल. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र नागरिकांनी आपल्या जागेशी संबंधित ग्रामपंचायत, नगर परिषद किंवा महसूल विभागाशी संपर्क साधून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करावी, असे आवाहन तहसीलदार गोपाल पाटील यांनी केले आहे. शासनाच्या या निर्णयामुळे राज्यातील हजारो कुटुंबांना त्यांच्या निवासस्थानाबाबत कायदेशीर हक्क मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# उमवि परीक्षा विभागा विरोधात मनविसे आक्रमक

## निकाल जाहीर न झाल्यास तीव्र आंदोलन

जन सम्राट टाईम्स

**जळगांव | प्रतिनिधी:** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या परीक्षा विभागाच्या कथित हलगर्जी कारभारामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आल्याचा आरोप महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेने (मनविसे) केला आहे. परीक्षा देऊनही विद्यार्थ्यांना निकालात 'गैरहजर' दाखविण्यात आल्याचा प्रकार समोर आल्याने विद्यार्थी व पालकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, चोपडा येथील दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालयातील TYBCA वर्गातील विद्यार्थ्यांनी एप्रिल २०२६ मध्ये झालेल्या विद्यापीठाच्या परीक्षेत नियमितपणे सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांनी 'BCA 603 : Android Application Development' या विषयाचा पेपर परीक्षा केंद्रावर प्रत्यक्ष उपस्थित राहून दिला होता. मात्र, नुकत्याच जाहीर झालेल्या निकालात संबंधित विद्यार्थ्यांना या विषयात 'गैरहजर' दाखविण्यात आले आहे. निकालातील या गंभीर त्रुटीमुळे विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम, चिंता आणि नैराश्याचे वातावरण निर्माण झाले आहे. विद्यार्थ्यांच्या म्हणण्यानुसार, त्यांनी परीक्षा दिल्याचे पुरावे परीक्षा केंद्रावरील उपस्थिती पत्रकांमध्ये उपलब्ध आहेत. निवेदनात संबंधित परीक्षा केंद्रावरील उपस्थिती पत्रके तातडीने तपासून सखोल चौकशी करावी, या प्रकारास जबाबदार असलेल्या दोषींवर कठोर कारवाई करावी तसेच प्रभावित विद्यार्थ्यांचा सुधारित निकाल तातडीने जाहीर करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. मनविसेचा आंदोलनाचा इशारा यावेळी मनविसे जिल्हाध्यक्ष कल्पेश राजेंद्र पवार यांनी सांगितले की, "विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष परीक्षा दिल्याचे पुरावे उपलब्ध असताना त्यांना निकालात गैरहजर दाखविणे हा विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करण्याचा प्रकार आहे. विद्यापीठ प्रशासनाने तातडीने योग्य निर्णय घेतला नाही, तर मनविसे आपल्या पद्धतीने तीव्र आंदोलन छेडेल. त्यास सर्वस्वी प्रशासन जबाबदार राहील.

# शिरपूर शहर पोलिसांची धडाकेबाज कारवाई!

## पिकअप वाहनासह दोघांना जेरबंद



जन सम्राट टाईम्स

**शिरपूर | प्रतिनिधी :** शिरपूर शहर पोलिसांनी चारचाकी वाहन चोरीच्या प्रकरणाचा अवघ्या काही दिवसांत यशस्वी छडा लावत दोन आरोपींना अटक केली असून त्यांच्याकडून रु. १ लाख ४० हजार किमतीचे चोरीचे पिकअप वाहन हस्तगत केले आहे. पोलिसांच्या या कारवाईचे सर्वत्र कौतुक होत आहे. जळोद (ता. शिरपूर) येथील आश्रम शाळेच्या आवारातून शाळेचे धान्य वाहतुकीसाठी वापरण्यात येणारे पिकअप छोटा हत्ती वाहन (क्र. एमएच-१५/सीके-४८८२) अज्ञात चोरट्यांनी २४ मे २०२६ रोजी दुपारी चोरून नेले होते.

याप्रकरणी शिरपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २३४/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास सुरू असताना शिरपूर शहर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक किशोरकुमार परदेशी यांना गोपनीय माहिती मिळाली की, जुने भामपूर येथील दोन युवकांनी सदर वाहन चोरी केले आहे. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तातडीने तपासाची सूत्रे वेगाने फिरवली. सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी संगम गंगाराम सोनवणे (भिल, वय २२, मूळ रा. चित्तेगाव, ता. चाळीसगाव, जि. जळगाव, सध्या रा. जुने भामपूर, ता. शिरपूर) आणि अनिल खेमराज भिल (भवरे, वय २२, रा. जुने भामपूर, ता. शिरपूर) या दोघांना ताब्यात घेतले. सखोल चौकशीत आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली. तसेच विखरण गावाजवळील एका पत्र्याच्या शेडजवळ लपवून ठेवलेले चोरीचे पिकअप वाहन पोलिसांना काढून दिले. पोलिसांनी वाहन जप्त करून मुद्देमाल हस्तगत केला.शिरपूर शहर पोलिसांनी वेगवान तपास करत अवघ्या सहा दिवसांत वाहन चोरीचा गुन्हा उघडकीस आणला. आरोपींना अटक करून त्यांच्याकडून चोरीचे वाहन हस्तगत करण्यात आले आहे.

### पोलिस पथकाची उल्लेखनीय कामगिरी

ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे आणि शिरपूर उपविभागीय पोलीस अधिकारी विश्वजीत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या मोहिमेत पोलीस निरीक्षक किशोरकुमार परदेशी, पोलीस निरीक्षक जयपाल हिरे तसेच पोलीस अंमलदार रविंद्र अखडमल, अतुल पाटील, योगेश दाभाडे, मनोज दाभाडे, सोमा ठाकरे, आरिफ तडवी, सचिन वाघ, विनोद अखडमल, गोविंद कोळी, मनोज महाजन, भटू साळुंके आणि प्रशांत पवार यांनी विशेष परिश्रम घेतले.

### पोलिस पथकाची उल्लेखनीय कामगिरी

सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी संगम गंगाराम सोनवणे (भिल, वय २२, मूळ रा. चित्तेगाव, ता. चाळीसगाव, जि. जळगाव, सध्या रा. जुने भामपूर, ता. शिरपूर) आणि अनिल खेमराज भिल (भवरे, वय २२, रा. जुने भामपूर, ता. शिरपूर) या दोघांना ताब्यात घेतले. सखोल चौकशीत आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली. तसेच विखरण गावाजवळील एका पत्र्याच्या शेडजवळ लपवून ठेवलेले चोरीचे पिकअप वाहन पोलिसांना काढून दिले. पोलिसांनी वाहन जप्त करून मुद्देमाल हस्तगत केला.

जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज | ज

# संत संस्कृतीची परंपरा जपणे काळाची गरज" - स्वामी अमृताश्रम महाराज

## पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या अभिष्टचिंतन सप्ताहात भक्तिरसाची उधळण!

जन सम्राट टाईम्स

**पाळधी, ता. धरणगाव | प्रतिनिधी:** समाजातील गरजू, पीडित आणि वंचित घटकांच्या सेवेतच खऱ्या अर्थाने ईश्वराचे दर्शन घडते. "जनसेवा हीच ईश्वरसेवा" हा संतांचा संदेश आजही तितकाच प्रेरणादायी असून संत संस्कृतीची परंपरा जपणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन ह.भ.प. स्वामी अमृताश्रम महाराज यांनी केले. पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त पाळधी येथे आयोजित अखंड हरिनाम संकीर्तन सप्ताहाच्या तिसऱ्या दिवशी स्वामी अमृताश्रम महाराज यांच्या ओजस्वी आणि विचारप्रवर्तक कीर्तनाने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाला. कीर्तनादरम्यान महाराष्ट्राच्या संतपरंपरेचा गौरव करताना स्वामी महाराज म्हणाले की, संतांच्या विचारांमुळे समाजात प्रेम, समता, बंधुता आणि अध्यात्मिक जागृती निर्माण होते. संतविचारांचे जतन व संवर्धन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असून त्यातूनच सुसंस्कृत आणि सुदृढ समाजाची निर्मिती होऊ शकते. यावेळी त्यांनी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या



जनहिताच्या कार्याचाही गौरव केला.

आरोग्यसेवा, वैद्यकीय मदत, डोळ्यांच्या शस्त्रक्रिया तसेच दीनदुबळ्यांच्या सेवेसाठी त्यांनी सातत्याने घेतलेल्या पुढाकाराचे कौतुक करत समाजहितासाठी सुरू असलेले त्यांचे कार्य हे जनसेवेचे जिवंत उदाहरण असल्याचे सांगितले. स्वामी अमृताश्रम महाराज यांच्या प्रभावी कीर्तनाने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. टाळ-मृदंगाच्या निनादात आणि विठ्ठलनामाच्या अखंड गजरात संपूर्ण परिसर भक्तिरसाने भारावून गेला. कार्यक्रमाला भगवान महाराज धरणगावकर, माधवानंद महाराज सरस्वती, निंबा महाराज वाघडूतकर, यज्ञेश महाराज माळी, मयूर महाराज दरेकर, कैलास महाराज पवार, शेखरजी वानखेडे, रामेश्वर महाराज (नाशिक) यांच्यासह अनेक संत-महंत उपस्थित होते. जीपीएस ग्रुप तसेच युवा नेते व जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील आणि विक्रम पाटील यांच्या नेतृत्वाखाली आयोजित या सप्ताहात तिसऱ्या दिवशी हजारो भाविकांनी सहभाग नोंदवला. भाविकांसाठी उभारण्यात आलेला भव्य मंडप, आधुनिक ध्वनी व्यवस्था, आकर्षक व्यासपीठ आणि विविध सुविधा यामुळे सप्ताहाचे स्वरूप अधिकच भव्यदिव्य झाले आहे.

### अध्यात्म आणि संतविचारांचा जागर

एकावेळी पाच ते सहा हजारांहून अधिक भाविक बसू शकतील अशी व्यवस्था करण्यात आली असून संपूर्ण परिसरात भक्ती, अध्यात्म आणि संतविचारांचा जागर अनुभवायला मिळत आहे. पाळधी येथे सुरू असलेल्या या अखंड हरिनाम संकीर्तन सप्ताहामुळे संपूर्ण पंचक्रोशीत भक्तिरसाची उधळण झाली असून दररोज मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहून हरिनामाचा लाभ घेत आहेत.